**आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या वैयक्तिक लाभाच्या योजनेकरीता पेसा अधिनियमाच्या अनुषंगाने अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेव्दारे करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**आदिवासी विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः ग्रासअ २०१३/ प्र.क्र. १५१ /का-१७**

मंत्रालय , विस्तार इमारत, मुंबई ४०००३२

दिनांक : २६ नोव्हेंबर, २०१३

**प्रस्तावना**

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांच्या उन्नतीकरीता विविध प्रकारच्या सामुहिक व वैयक्तिक स्वरुपाच्या योजना राबविण्यात येतात. राज्यातील अनुसूचित जमातीची बहु लोकसंख्या ही ग्रामीण भागात आहे. विभागामार्फत राबविण्यात येणा-या वैयक्तिक योजनेचा लाभ हा नागरी तसेच ग्रामीण व आदिवासी क्षेत्रातील संबंधित लाभार्थ्यांना राज्यातील २९ प्रकल्प कार्यालय असलेल्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालर्याकडून देण्यात येतो. सद्य:स्थितीत नागरी, ग्रामीण व आदिवासी क्षेत्रातील लाभार्थ्यांची निवड ही प्रकल्प कार्यालयाकडून करण्यात येते. विभागामार्फत राबविण्यात येणा-या वैयक्तिक लाभाच्या योजनेचे लाभ लाभार्थ्यांना व्यापक स्वरुपात प्राप्त होण्याच्या दृष्टीने ग्रामीण व आदिवासी क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेमार्फत पेसा अधिनियमाशी सुसंगत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय**

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्याच्या उन्नतीकरीता विविध प्रकारच्या सामुहिक व वैयक्तिक स्वरुपाच्या योजना राबविण्यात येतात. आदिवासी विकास विभागामार्फत खालील प्रकारच्या वैयक्तिक लाभाच्या योजना अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांकरीता राबविण्यात येतात:-

१) खावटी कर्ज योजना.

२) स्वाभीमान सबळीकरण योजनेतर्गंत भूमिहीन आदिवासींना जमिनी देणे.

३) कन्यादान योजना

४) पारधी समाजाच्या योजना

५) आदिम जमातीच्या कुटूंबाना व्यक्तीगत योजनेचा लाभ देणे.

६) शबरी आदिवासी घरकूल योजनेतर्गत आदिवासी पात्र लाभार्थ्यांना घरकूल उलब्ध करुन देणे.

७) आदिवासी शेतक-यांना विज पंप/ तेल पंप, एचडीपीई, पीव्हीसी पाईप्स उपलब्ध करुन देणे.

८) न्युक्लिअस बजेट योजनेतर्गंत राबविण्यात येणा-या योजनांकरीता अर्थसहाय्य.

उपरोक्त योजनांकरीता अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची निवड ही ग्रामसभेव्दारे करण्यात यावी. यामुळे पेसा अधिनियमाशी सुसंगत अशी कार्यवाही होईल. ग्रामसभेव्दारे निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी प्रशासकीय बाबींची पूर्तता प्रकल्पस्तरावर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून करण्यात येवून त्यानुसार लाभार्थ्यांना अंतिमत: योजनेचा लाभ देण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

आदिवासी उपयोजनेतर्गंत उपलब्ध करुन देण्यात येणा-या निधीतून, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणा-या वैयक्तिक लाभाच्या योजनांतील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची निवड देखील ग्रामसभेमार्फत करण्यात यावी.

हा शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२/१३/ पंरा ३, दिनांक २१.१०.२०१३ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३११२२१२५५५५८७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Khandare Mahadeo S

Digitally signed by Khandare Mahadeo S
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=MTD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Khandare Mahadeo S
Date: 2013.12.11 12:53:19 +05'30'

**( म.सो. खंडारे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई

२. मा. मुख्यमंत्र्याचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्र्याचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री / राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय यांचे खाजगी सचिव
५. मा.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद सदस्य
७. मा. मुख्य सचिव
८. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ३२
९. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग ( ग्राम विकास व पंचायत राज), बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -०१
१०. अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
११. प्रधान सचिव, कृषी, व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१२. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१३. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य आदिवासी आर्थिक विकास महामंडळ
१५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई / नागपूर
१६. सर्व अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर
१७. सर्व विभागीय आयुक्त
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२०. सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती
२१. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय
२२. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२३. सर्व मंत्रालयीन विभाग
२४. सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी , आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२५. उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग ( प.रां.- ३), बांधकाम भवन, मर्झबान रोड,फोर्ट, मुंबई -०१
२६. निवड नस्ती (का-१७)